**(REVISED COURSE)** **QP Code : 17385**

(3 Hours) **[ Total Marks : 100**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. (अ) साहित्यप्रकाराच्या वर्गीकरणामागील विविध भूमिकांचा थोडक्यात परामर्श घेऊन 'कथा' या साहित्यप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

(आ) कथनात्म साहित्यप्रकारातील कादंबरी, महाकाव्य या साहित्यप्रकारांहून 'कथा' या साहित्यप्रकाराच्या असलेल्या साम्यभेदांची थोडक्यात तुलना करा.

२. (अ) 'समाधी व इतर सहा गोष्टी' च्या आधारे दिवाकर कृष्णांच्या कथांमधील वातावरण आणि भाषा या घटकांची वैशिष्ट्ये उदाहरणांसह स्पष्ट करा.

**किंवा**

(आ) जी. ए. कुलकर्णींच्या कथांमधील सामान्य पात्रे त्यांच्या करूणोदात्त मनोवृत्तीमुळे असामान्य होऊन जातात. - या विधानाची 'रक्तचंदन' मधील कथांच्या आधारे चर्चा करा.

३. (अ) आघाडीचे नवकथाकार म्हणून गंगाधर गाडगीळांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये 'निवडक गंगाधर गाडगीळ' या कथासंग्रहातील कथांच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

(आ) बाबुराव बागूल यांच्या कथांमधील संघर्ष आणि शोषणाचे स्वरूप 'जेव्हा मी जात चोरली होती' मधील कथांच्या आधारे स्पष्ट करा.

४. (अ) कमल देसाई यांच्या कथांमध्ये स्त्रीजीवनाची खासगी व सार्वजनिक स्तरावरील कोंडी आढळते. - या विधानाची 'रंग-२' मधील कथांच्या आधारे चर्चा करा.

**किंवा**

(आ) गौरी देशपांडे यांच्या स्त्री आणि पुरूष पात्रचित्रणाची वैशिष्ट्ये 'आहे हे असे आहे' मधील कथांच्या आधारे स्पष्ट करा.

५. (अ) सखा कलाल आणि आसाराम लोमटे भिन्नभिन्न काळातील ग्रामीण व्यवस्थेचा आपल्या कथांमधून वेध घेत असल्यामुळे त्यांच्या कथांमध्ये साम्यस्थळे कमीच आढळतात - या विधानाची 'ढग' आणि 'आलोक' मधील कथांच्या आधारे साधकबाधक चर्चा करा.

**किंवा**

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टिपा लिहा :-
(१) कथा आणि प्रवासवर्णन या कथनपर साहित्यप्रकारातील साम्यभेद
(२) 'रक्तचंदन' मधील लहान मुलांचे भावविश्व
(३) कमल देसाईंच्या कथांमधील फँटसी.

---